# शासकीय तंत्रनिकेतन कोल्हापूर

(महाराष्ट्र शासनाची स्वायत संस्था)

(दुरध्वान:०२३१-२५२१०३८) विद्यानगर कोल्हापूर (फॅक्स: ०२३१-२५२१०१६)

ई-मेल: gpkolhapur@yahoo.com **परीक्षा विभाग** संकेत स्थळ www.gpkolhapur.org.in


जा.क्र.शातंनिको/पवि/२०२०/221 दि. ०९/१०/२०२०

**परिक्षा / चाचणी शुल्क**

# विद्यार्थ्यांना सुचना

**विषय :- तृतीय व पाचव्या सत्राच्या नियमीत विषय नोंदणी व परीक्षा अर्ज भरणेबाबत...**
**(फक्त R) – ( हिवाळी सत्र परिक्षा - २०२०)**

सर्व विद्यार्थ्यांना कळविणेत येते की, विषम सत्र २०२०-२१ च्या नियमीत विषयांची नांदणी व परीक्षा अर्ज खाली दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे भरावयाचा आहे.

| Date | Programme (Both Shifts) |
|---|---|
| 12/10/2020 To 21/10/2020 | All Programme |

नियमीत (R) परिक्षा विद्यार्थ्यासाठी ६०० रूपये ( सत्र परिक्षा रू.५०० चाचणी परिक्षा - रू १००)

१) विषय नोदणी व परिक्षा अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरावयाचा आहे. त्यासाठी प्रथमतः विद्यार्थ्यानी संस्थेच्या संकेत स्थळावर (www.gpkolhapur.org.in) त्यांचे माहिति पत्रक (E-Registration) बिनचुक भरणे आवश्यक आहे. माहितीपत्रकामध्ये फोटो, ई-मेल अॅड्रेस, मोबाईल नंबर ची माहिति काळजीपुर्वक वाचून गरज असल्यास दुरूस्त करून घ्यावी. प्रत्येक विद्यार्थ्यांने स्वतःचाच मोबाईल नंबर व ई-मेल आयडी भरावा जेणेकरुन संगणक प्रणालीचा वापर विद्यार्थी वैयक्तीकपणे करु शकतील. विद्यार्थ्याना परिक्षेसंबंधित व इतर कार्यालयीन कामकाजाकरीता माहिति पत्रकामध्ये नोंदणी केलेल्या या मोबाईल नंबर व ई-मेल व्दारे सुचना देणेत येतील.

२) आपला पासवर्ड विद्यार्थ्यानी गोपनिय ठेवावा तसेच तो विसरणार नाही याची दक्षता घ्यावी. पासवर्ड विसरलेस रु.५०/- इतके शुल्क भरुन पासवर्ड घेता येईल.

३) सर्व विद्यार्थ्यांनी विषम सत्र २०-२१ विषय नोंदणी ( R ) संबंधी आपल्या विभागातील नोंदणी अधिकारी वर्ग शिक्षक यांच्याशी ( आवश्यक असल्यास Physical distancing चे नियम - (६फुट) - पाळून ) संपर्क साधुन योग्य ते मार्गदर्शन घ्यावे व नंतर ऑनलाईन अर्ज भरावा. Detain झालेल्या विषयांची नोंदणी पुन्हा R म्हणून करुन विद्यार्थ्यांने त्याचे सत्र कर्म पुर्ण करणे आवश्यक आहे याची नोंद घ्यावी.

४) एकदा विषय नोंदणी /परीक्षा अर्ज विद्यार्थ्यांने ऑनलाईन Save केल्यानंतर त्यात बदल करता येणार नाही. अपवादात्मक परिस्थितीत विषय नोंदणी अधिकारी / वर्ग-शिक्षक यांचे कडुन बदल करुन घ्यावा व तदनुसार केलेल्या बदलाची खात्री करुन सुधारीत प्रत जवळ ठेवावी.

५) विषय नोंदणी व परीक्षा अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरलेनंतर विषयनोंदणी/परीक्षा अर्जाची छापील प्रत घेऊन शैक्षणिक व इतर फी ऑनलाईन पध्दतीने आकारणेसाठी विद्यार्थी विभागाशी

आवश्यकता असल्यास संपर्क साधावा. विद्यार्थी विभागाने आकारलेले शैक्षणिक शुल्क, इतर फी व परीक्षा फी ऑनलाईन पध्दतीने एकत्रीत भरावी. फी पावतीची छापील प्रत घ्यावी. या पावतीची दुय्यम प्रत व विषयनोंदणी अर्ज विभागातील विषय नोंदणी अधिकारी यांच्याकडे कायम करणेसाठी (confirm ) email / WhatsApp व्दारे पाठवावे. विषय नोंदणी अधिकारी दि.१६/१०/२०२० ते २३/१०/२०२० या कालावधीत अर्ज कायम (confirm ) करतील.

विषय नोंदणी अधिकाऱ्यांनी अर्ज कायम केल्याशिवाय विद्यार्थ्यांना परीक्षेस बसता येणार नाही याची नोंद घ्यावी.

- अर्ज भरताना काही तांत्रिक अडचण आल्यास केवळ याच कामाकरीता परीक्षा विभागामध्ये email (gpkpexam@gmail.com) व्दारा साधावा
- २ -या व ४ थ्या सत्रांच्या " RR" विषयांची परिक्षा ही नंतर घेण्यात येणार असून त्याची सुचना लवकरच जाहीर हाईल.

प्राचार्य,
शासकीय तंत्रनिकेतन,कोल्हापुर

प्रत:-

१. सर्व नोटीस बोर्डवर जाहीर..
२. रोखपाल व विद्यार्थी विभाग यांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.
३. सर्व विभागाना जाहीर करणेसाठी